# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक ४ मार्च, २०२६

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

(१) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयात नवीन एमआरआय मशीन तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत.

(२) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३ वर उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) निवेदन करतील :-**

मुंबई येथील वरळी प्रभाग १९६ मध्ये सत्यनारायण अपार्टमेंट व सी फेस हाऊस, खान अब्दुल गफारखान रोड या विभागात ५० वर्षापासून अस्तित्वात असलेल्या इमारतींचा पुनर्विकास खाजगी विकासकांमार्फत सुरु असणे.

(३) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

नर्सरी, बालवाडी शाळा परिसरातील सुरक्षिततेचा अभाव आणि पूर्व-प्राथमिक शाळांमधील सुरक्षा नियमावलीबाबत कडक निर्देश जारी करण्याची आवश्यकता.

(४) **श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

रोटा/एचबी-११८२ (१,८००-०२-२०२६)-१

अतिरिक्त ठरणाऱ्या रात्र शाळेतील शिक्षकांना सेवा सातत्य आणि वेतन संरक्षण न मिळाल्यामुळे त्यांच्या उपजीविकेचा निर्माण झालेला प्रश्न.

(५) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील १,१६४ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सोय आणि ३,३२८ शाळांमध्ये वीज नसल्याबाबत.

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.अरुण लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील सांगली जिल्हा बेदाण्याची पंढरी म्हणून देशभर प्रचलित असणे, बेकायदेशीर कामे करणाऱ्या व्यापाऱ्यांवर भेसळ प्रतिबंधक कारवाई कायद्याअंतर्गत कठोर कारवाई करण्यासाठी तसेच परकीय बेदाणे भारतीय म्हणून विकणाऱ्या व्यापाऱ्यांचा विक्री परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यासाठी जिल्ह्यातील विविध शेतकरी संघटनांनी दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केलेले असणे, भारतासह जगभर दर्जेदार बेदाण्याचे उत्पादन झाल्यावर निर्यात करून बेदाण्याचे जीआर मानांकन मिळवण्याची किमया या जिल्ह्याने केलेली असणे, देशासह जगभरात निर्यात होणाऱ्या बेदाण्यांपैकी ७० % पेक्षा जास्त बेदाणा हा सांगली-तासगावचा असणे, मागील दोन वर्षात बेदाणा उत्पादनात कमालीची घट झाल्यामुळे त्याच्या दरात दुपटीने वाढ झाली असणे, परंतु याचा फायदा सांगली तासगावच्या बेदाणा इंडस्ट्रीवर ठाण मांडून बसलेल्या काही व्यापाऱ्यांनी घेतला असणे, अफगाणिस्तान तसेच चीन सारख्या देशांतून निकृष्ट दर्जाचा बेदाणा चोरट्या मार्गाने आयात करून तो महाराष्ट्रातील बेदाण्याच्या बॉक्समध्ये घातक प्रक्रिया करून राजरोसपणे विकला जाणे, द्राक्ष बागायतदार संघाने याबाबत बाजार समिती व प्रशासन यांच्याकडे अनेक वेळा तक्रारी दिल्या असणे, उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने त्यांच्यामध्ये पसरलेली असंतोषाची भावना, बेकादेशीर कामे करणाऱ्या दोषी व्यापाऱ्यांचे परवाने बाजार समितीने कायमस्वरूपी रद्द करण्याची आवश्यकता, त्यामुळे अवैध कृत्यांना प्रतिबंध म्हणून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

**(गुरूवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना)** - **[अनुक्रमांक (२)]** —

**(२)** **श्री. जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"हिंगोली जिल्ह्यातील औढा—वसमत रोडवरील शिराड शहापूर हे गांव जवळा बाजारापासून १२ कि.मी. वर असणे, हमरस्त्यावर असलेल्या या गावातील टेकडीचे मोठ्या प्रमाणात उत्खनन केले जाणे, टेकडी खोदून तेथील माती, दगड आणि अन्य खनिजे ट्रकचे ट्रक भरुन वाहून नेले जाणे, त्यामुळे निसर्गाच्या संतुलनाच्यादृष्टीने मौल्यवान असलेली टेकडी नष्ट करण्याचा प्रयत्न केला जाणे, उत्खननाचे गैरकृत्य पार पाडणाऱ्या कंत्राटदाराच्या नोकराची या बेकायदेशीर कृत्यावर देखरेख असणे, सोबतच पूर्णा व कयादू नदीपात्रातील वाळूचा अनधिकृत उपसा करुन, नदीतील खडकापर्यंत वाळूचा उपसा करुन नदीचे पात्र असुरक्षित बनविणे आणि हे सर्व गैरप्रकार सुरु असतांना निम्नस्तरीय शासकीय यंत्रणेचे या अवैध उत्खननाकडे आणि वाळूच्या उपशाकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे पर्यावरणाची होत असलेली कधीही भरुन न निघणारी हानी आणि पशुपक्षांसह मानव जातीच्या अस्तित्वाला यामुळे निर्माण होणारा संभाव्य धोका, सदर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरूवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ व शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ व शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना)** - **[अनुक्रमांक (३)]** —

**(३)** **श्री.हेमंत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नांदेड जिल्ह्यातील कार्यरत असलेल्या शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्रभारी अधिष्ठाता यांनी आपल्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करून पात्र कर्मचाऱ्यांना अपात्र ठरवणे व अपात्रांना पात्र ठरविणे, तसेच विविध प्रशासकीय बाबींमध्ये नियमबाह्य निर्णय घेऊन गंभीर आर्थिक व प्रशासकीय अनियमितता केल्याच्या तक्रारी समोर येणे, या संदर्भात स्थानिक आमदारांनी आयुष संचालनालयाकडे लेखी तक्रार सादर करणे, संबंधित अधिकाऱ्यांशी असलेल्या कथित संबंधांचा प्रभाव वापरून प्रक्रियेत हस्तक्षेप झाल्याचा आरोप होणे, यामुळे महाविद्यालयाची शैक्षणिक प्रतिमा व प्रशासनाची पारदर्शकता धोक्यात येणे, ही अत्यंत गंभीर बाब असून सदर प्रकरणाची दखल घेऊन वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी चौकशीचे आदेश दिले असले तरी, चौकशीची व्याप्ती, कालमर्यादा व दोषींवर होणारी कारवाई याबाबत स्पष्टता नसल्याने

शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (४)] —**

(४) **श्री.कृपाल तुमाने, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नागपूर मार्गे राज्यात मोठ्या प्रमाणात विदेशी सुपारी (Areca Nut) बेकायदेशीररित्या येत असल्याची बाब निदर्शनास येणे, सदर विदेशी सुपारी अत्यंत निकृष्ट दर्जाची असून योग्य आयात नोंदी अथवा वैध कागदपत्रांशिवाय राज्यात आणली जात असणे, सदर प्रकार वारंवार उघडकीस येणे, नागपूर हे देशाच्या मध्यवर्ती स्थानी असल्यामुळे मोठे वाहतूक व वितरण केंद्र असल्याने या मार्गाचा वापर करून संबंधित माल राज्यातील विविध जिल्ह्यांत पाठविला जात असल्याचे निदर्शनास येणे, वाहतुकीदरम्यान बनावट कागदपत्रे, करचोरी तसेच इतर अवैध व्यवहार झाल्याचे आढळून येणे, तसेच या माध्यमातून अंमली पदार्थ किंवा इतर प्रतिबंधित वस्तूंची वाहतूक होत असल्याची शक्यताही तपास यंत्रणांकडून व्यक्त करण्यात येणे, याप्रकारामुळे राज्यातील कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य तसेच वैध व्यापारावर विपरीत परिणाम होणे, सदर प्रकरणात अनेक अधिकारी सहभागी असल्याची शक्यता असणे, शासनाने सदर प्रकरणाची पारदर्शक चौकशी करून दोषी आढळून येणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची तसेच भविष्यात अशा बेकायदेशीर वाहतुकीला आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (५) ते (७)] —**

(५) **श्री.विक्रांत पाटील, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"रायगड-जिल्ह्यातील तालुका-पनवेलमधील सिडको-नियोजन प्राधिकरणात १८-गावांचा समावेश असणे, गावकऱ्यांनी नवी-मुंबई-प्रकल्पाकरिता आपल्या जमिनी भूसंपादनाद्वारे सिडकोकडे हस्तांतरित केल्याने त्यावर आज-रोजी नवी-मुंबई व पनवेल ही-शहरे अस्तित्वात येणे, असे-असताना सिडकोकडून अद्यापही बऱ्याचश्या ७/१२ वर "मे. आयुक्त-मुंबई यांच्याकडील नोटिफिकेशन क्र.एल.क्यू.सी. दि.०३.०२.७० नुसार भूसंपादनात

अशा प्रकारचे भूसंपादनाचे-शेरे ठेवलेले असून आजपर्यंत संबंधित शेतकऱ्यांना या जमिनीचा मोबदला किंवा सिडकोद्वारे दिला जाणारा १२.०५% किंवा यथास्थिती २२.०५% चा लाभ दिला गेलेला नसणे, यामुळे संबंधित शेतकऱ्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांच्या जमिनी सिडको-प्राधिकरण संपादनही करत नसणे व त्यांना त्या जमिनी विकताही येत नसणे, तसेच संबंधित जमिनींची विकास परवानगी सुद्धा सिडको प्राधिकरणाकडून दिली जात नसणे, यामुळे शेतकऱ्यांची प्रचंड आर्थिक कुचंबणा झालेली असून सिडको प्राधिकरणास व जिल्हाधिकारी - रायगड यांनी अशा उल्लेख केलेल्या प्रकरणातील जुन्या भूसंपादन कायदा १९९४ नुसार सुरू केलेली भूसंपादन प्रक्रिया व्यपगत करून Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition Rehabilitation and Resettlement Act 2023 चे कलम २४ (२) या नवीन कायद्यानुसार विचार करणे, शेतकऱ्यांना मान्य असलेल्या दराप्रमाणे जमिनी एक तर मोबदला देऊन अधिग्रहित करणे अथवा सातबारा वरील शेरा तात्काळ काढून टाकणे याबाबत शेतकऱ्यांची वारंवार असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने लक्ष घालून करायची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"देशात ९ लाख हेक्टरवर केळीची शेती होत असून भारत जगात ३०% वाटा उचलत असणे, महाराष्ट्रातून सध्या प्रामुख्याने इराण, इराक, दुबई, तुर्की, ओमान, कुवेत आणि सौदी अरेबिया या देशांत मोठी निर्यात होत असणे, मागील वर्षी ३९,००० कंटेनरच्या विक्रमी निर्यातीतून देशाला ४,२०० कोटींचे परकीय चलन मिळालेले असणे, केळी निर्यातीने द्राक्षांना मागे टाकले असूनही अद्याप स्वतंत्र बोर्ड नसणे, तर चहा, कॉफी, मसाला व अगदी नुकतेच हळद या पिकांसाठी स्वतंत्र बोर्ड स्थापन करण्यात आलेले असणे, केळी बोर्डाअभावी आधुनिक सुविधांचा अभाव असल्याने सिंगापूर, युरोप, रशिया, जपान, दक्षिण कोरिया, चीन आणि अमेरिका यांसारख्या प्रगत बाजारपेठांमध्ये निर्यात करण्यास मर्यादा येत असणे, या नवीन बाजारपेठांमध्ये निर्यात वाढल्यास राज्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक लाभ मिळण्याची शक्यता असणे, राज्यातील रेल्वे स्टेशनवर कंटेनर लोडिंगची कायमस्वरूपी सुविधा निर्माण करणे, 'फ्रूट केअर' योजना व पॅक हाऊससाठी विशेष सबसिडी देणे, राज्य शासनाने केंद्र सरकारकडे 'केळी बोर्ड' स्थापनेबाबतचा अधिकृत प्रस्ताव तातडीने पाठवून त्याचा प्रबळ पाठपुरावा करणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **सर्वश्री विक्रम काळे,** अमोल मिटकरी, सतिश चव्हाण, इद्रिस नायकवडी, पंकज भुजबळ, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री. सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाने कर्करोगाचे वेळेत निदान व्हावे याकरीता हाती घेतलेल्या मोहिमेत गत वर्षी दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५ पासून राज्यव्यापी कर्करोग तपासणी व जनजागृती मोहिमेअंतर्गत ३ कोटी ५ लाखांची तपासणी केल्यानंतर त्यातून ४१ हजार १६९ संशयित कर्करुग्णांची नोंद झाली असून बायोप्सी झाल्यानंतर १,६७७ जणांना कर्करोगाचे निदान झाले असून ४१६ रुग्णांवर सार्वजनिक आरोग्य संस्थांमार्फत करण्यात येत असलेले उपचार, तसेच मुंबई हे शहर फुफ्फुस कर्करोगाचे हॉटस्पॉट बनले असून केवळ धुम्रपान करण्यापुरता हा रोग मर्यादीत राहीला नसून शहरातील विषारी हवेमुळे नॉनस्मोकर्सही या रोगाला बळी पडले असणे, मुंबईतील आकडेवारीनुसार फुफ्फुस कर्करोगाच्या रुग्णांमध्ये ५७% ॲडेनोकार्सिनोमा, २८% स्क्वॅमस सेल कार्सिनोमा आणि १६% स्मॉल सेल कार्सिनोमा आढळून येणे, त्यामुळे कर्करोग्यांचे दिवसेंदिवस वाढत असलेले प्रमाण, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, तसेच महिलांमध्ये स्तन आणि गर्भाशयमुख कर्करोगात देखील झालेली वाढ लक्षात घेता, शासनाने या रुग्णांना योग्य तो औषधोपचार मोफत अथवा स्वस्त दरात उपलब्ध करुन देण्यासाठी करावयाची आवश्यक ती कार्यवाही व अशा प्रकारचे रोग होऊ नयेत, तसेच शासनाने टाटा या खाजगी रुग्णालयासह इतर शासकीय रुग्णालयांनादेखील आवश्यक निधी तातडीने मंजूर करुन औषधोपचार सेवा उपलब्ध करुन देणे, याकरिता नागरिकांना करावयाचे आवश्यक ते मार्गदर्शन व घ्यावयाची खबरदारीबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्या गर्भाशयातील बीजांड काढून बेकायदेशीर विक्री केल्याचे प्रकरण उघड झाले असणे, त्यांच्या गरिबीचा, असुरक्षिततेचा आणि आरोग्याच्या अज्ञानाचा फायदा घेतला असून ही बाब अत्यंत वेदनादायक असणे, ठाण्यातील IVF सेंटर्स पोलिसांच्या रडारवर असून आतापर्यंत १० लाख किंमतीचा औषध साठा जप्त केला असणे, तीन विशेष पथक वेगवेगळ्या ठिकाणी छापेमारी करत असल्याचे समजणे, २० पेक्षा जास्त महिलांचा वापर झाल्याचा प्राथमिक अंदाज समोर येणे, या रॅकेटमध्ये फक्त दलाल महिलांनाच अटक झाली असून संबंधित

डॉक्टर, IVF क्लिनिक्स किंवा व्यवस्थापनावर अद्याप कारवाई केलेली नसल्याचे समोर येणे, त्यामुळे या प्रकरणाचा तपास उच्चस्तरीय समितीकडे सोपविण्यात यावा, राज्यव्यापी IVF केंद्रांचे विशेष ऑडिट जाहीर करावे व पिडीत महिलांसाठी आरोग्य व कायदेशीर मदत जाहीर करण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **सर्वश्री किरण सरनाईक,** ज्ञानेश्वर म्हात्रे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोकण विभागातील पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व मुंबई जिल्ह्यातील वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली थकीत देयके, फरक देयके, मेडिकल देयके, ना परतावा देयके अनेक दिवसांपासून प्रलंबित असणे, अमरावती विभागात शिक्षण उपसंचालक स्तरावर शिक्षणाधिकारी यांची विविध प्रमाणपत्रे प्रत्येक देयकासोबत मागितली जाणे, शिक्षणाधिकारी प्रत्येक कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र देऊ शकत नसणे, परिणामी देयके नामंजूर होत नसणे, चालू आर्थिक वर्षापूर्वीची विविध थकीत देयके निकाली काढण्यासाठी जिल्हा वेतन पथक अधीक्षक, शिक्षण उपसंचालक व शेवटी संचालकांची मंजुरी लागत असणे, शिक्षण संचालक यांच्या दिनांक २९ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रानुसार वेतन पथक अधीक्षक व शिक्षणाधिकारी यांना तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक यांना देयके मंजूर करण्यास अडथळे येत असणे व कित्येक देयके नामंजूर झालेली असणे, मागील पाच ते सहा वर्षांपासूनची विविध देयके प्रलंबित असणे, त्यामुळे ही थकीत देयके मंजूर करण्यासाठी वर्षभर प्रक्रिया चालू ठेवण्याची गरज असणे, तसेच जी देयके संचालक स्तरावरून मंजूर झालेली आहेत ती पुन्हा सादर करण्याची गरज न ठेवणे, किंवा शिक्षण उपसंचालक स्तरावर अशी देयके मंजूर करण्याचे अधिकार प्रदान करण्याची गरज असणे, सदरची देयके प्रतिपूर्तीकरिता शाळांनी ऑनलाईन प्रस्ताव सादर केलेला असणे, ही देयके ऑनलाईन अपलोड करण्याकरिता माहे डिसेंबर अथवा माहे जानेवारी या महिन्यांमध्ये टॅब उपलब्ध करून दिला जात असणे, त्यानुसार शाळा आपल्या शाळेतील कर्मचाऱ्यांची थकीत देयके ऑनलाईन सादर करीत असणे, परंतु शिक्षण विभागातील काही कामाची टाळाटाळ करणारे लिपिक व अधिकारी वर्गामुळे देयके प्रलंबित राहणे, तसेच पे युनिट, उपसंचालक व शिक्षण संचालक कार्यालय, पुणे यांच्याकडून करोडो रुपयांची देयके अमान्य केल्याची धक्कादायक माहिती समोर येणे, सदर देयके मंजूर करण्याकरिता आर्थिक देवाण-घेवाण केली जात असणे, आर्थिक बाबी न पुरवल्यामुळे प्रतिपूर्ती देयके अमान्य केल्याचे उघडकीस येणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **सर्वश्री राजहंस सिंह,** हेमंत पाटील**, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"स्टर्लिंग को.ऑप.सोसायटी, गुलमोहर क्रॉस रोड नं.१०, जेव्हीपीडी (सीएस क्र.१२७) जुहू, सांताक्रुज (प.) मुंबई या संस्थेमधील म्हाडाचे उपनिबंधक यांनी संस्थेच्या काही सभासदांशी/ सदनिकाधारकांशी तसेच काही तथाकथित दलालांशी संगनमत करून आपल्या पदाचा दुरुपयोग करून व्यवस्थापन समिती विरुद्ध कोणतीही तक्रार नसतानासुद्धा आर्थिक भ्रष्टाचार करून आदेश निर्गमित करण्यात येणे, सदर गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन समिती सदस्यांना एम.सी.एस. कायद्याचे कलम ७८ अ (१) (ब) हे कलम लागू होत नसतानाही उपनिबंधकानी पदाचा दुरूपयोग करून सदस्यत्व रद्द करणे, सदर प्रकरणी म्हाडा ठराव क्र.६४८०, दिनांक ६ मे, २०१० लागू होतो किंवा कसे याबाबत म्हाडाचे अभिप्राय न घेणे, उपनिबंधकानी एकतर्फी आदेश जारी केल्याने निलंबित सदस्यांवर अन्याय होत असणे, सन २००४ मध्ये सोसायटीचे अधिकृत सदस्यत्व प्राप्त केलेले सदस्य दिनांक २५ मे, २०१८ रोजीच्या सोसायटी निवडणूकीत विजयी असूनसुद्धा उपनिबंधकानी ५ सदस्यांचे सोसायटी सदस्यत्व रद्द करण्याचा आदेश जारी केल्याने त्यांना फ्लॅट मिळण्यापासून वंचित रहावे लागत असणे, उक्त विषयाबाबत संभाजी ब्रिगेडचे अध्यक्षांनी मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री व सहकार आयुक्त यांना दिनांक ३ जून, २०२५ रोजी लेखी पत्र देऊनही यावर अद्याप कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(११) **डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील शहरी भागातही पॅथॉलॉजी लॅबची झपाट्याने वाढलेली संख्या, या लॅबपैकी काही लॅबमध्ये प्रशिक्षित पॅथॉलॉजिस्ट किंवा मान्यताप्राप्त डॉक्टर नसतानाही तपासणी अहवाल दिले जात असल्याचे समोर येणे, तर काही ठिकाणी लॅब टेक्निशियन किंवा अन्य कर्मचा-यांकडून रिपोर्टवर पॅथॉलॉजिस्ट डॉक्टरांची डिजिटल सही केली जात असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे लॅबमधील आरोग्य तपासण्यांवरील नागरिकांचा उडत चाललेला विश्वास, अनेक लॅबमधून दिल्या जाणाऱ्या तपासणी अहवालाबाबत समोर आलेल्या गंभीर बाबी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, पॅथॉलॉजी लॅबच्या कारभारात पारदर्शकता यावी याकरिता नियमावली तयार करण्याची आवश्यकता, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या लॅबवर कारवाईची तरतुद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**सहा : शासकीय विधेयके –**

**(क) पुर:स्थापनार्थ:-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०२६

**(ख) विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

एचबी-११८२ (१,८००-०२-२०२६)-३

**(२)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०९ – महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२५

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०९ – महाराष्ट्र कारागृहे व सुधार सेवा विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**सात : (क) (मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६, बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६, गुरूवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६, शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ व शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) – (मंत्र्यांचे उत्तर)**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, सदाशिव खोत, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, सर्वश्री सतिश चव्हाण, दादाराव केचे, श्रीमती भावना गवळी, श्री. पंकज भुजबळ, डॉ. परिणय फुके, सर्वश्री कृपाल तुमाने, संजय खोडके, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, अमोल मिटकरी, योगेश टिळेकर, चंद्रकांत रघुवंशी, शिवाजीराव गर्जे, अमित गोरखे, इद्रिस नायकवडी, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री संजय केणेकर, संदीप जोशी, वसंत खंडेलवाल, प्रसाद लाड, अमरिशभाई पटेल, ॲड. निरंजन डावखरे, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री. धर्मगुरू बाबूसिंग राठोड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

"राज्यातील शेतक-यांच्या उत्पन्न वाढीसाठी, शाश्वत शेतीसाठी आणि जागतिक स्पर्धात्मकतेसाठी 'AI for Agri २०२६' ही परिषद शेतक-याला जागतिक तंत्रज्ञानाची ताकद देण्याकरिता नवा टप्पा ठरणार असणे, कृषी क्षेत्रासाठी स्वतंत्र AI धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असणे, 'महाॲग्री-एआय' धोरण २०२५-२०२९ अंतर्गत शेतीमध्ये आर्टिफिशियल इन्टेलिजन्स, जनरेटिव्ह एआय, ड्रोन आणि रॉबोटिक्सचा वापर सुरु होणार असणे, राज्यात शेतक-यांच्या आयुष्यात क्रांती घडविणारी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना' राबविण्याचे धोरण असणे, या योजनेसाठी मनरेगा व इतर १३ विविध योजनांतून आणि सीएसआर निधीमधून निधी उपलब्ध केला जाणार असणे, या योजनेमध्ये रस्त्यासाठी लागणारी मोजणी आणि पोलीस बंदोबस्ताचे शुल्क शासनाने पूर्णपणे माफ केले असणे, रस्त्याच्या मजबुतीकरणासाठी लागणारे गाळ,

माती, मुरुम आणि दगडासाठी कोणतीही रॉयल्टी लागणार नसणे, राज्यात आक्रमक बिबटे, वाघ व अन्य वन्य प्राण्यांमुळे शेतीला धोका निर्माण होत असल्याने या प्राण्यांमुळे शेडयुल १ मधून शेडयुल २ मध्ये आणण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन असणे, वन्यजीव हल्ल्यात मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात येणार असणे, सन २०२६ च्या खरीप हंगामापासून वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या पिक नुकसानीची भरपाई पंतप्रधान पिक विमा योजनेतून देण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला असणे, भातपिकाला पूर वा अतिवृष्टीचा फटका बसल्यास पिक विमा योजनेतून संरक्षण देण्याचा निर्णय घेतला असणे, पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्याचे धोरण असणे, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

**(ख) (गुरूवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६, शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ व शनिवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (मंत्र्यांचे उत्तर)**

**श्री. सतेज उर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील शेतक-यांना सरसकट व संपूर्ण कर्जमाफी, मोफत वीज पुरविणे, शेतमालाला हमीभाव देणे इत्यादी घोषणांचा शासनाने पाऊस पाडणे, त्यातच शेतकरी अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, गारपीट या निसर्गकोपामुळे उद्ध्वस्त होणे, अद्यापही शेतक-यांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याने त्यांच्यावर दुहेरी संकट ओढवणे, पीक विमा कंपन्या कडून शेतक-यांना अत्यल्प नुकसान भरपाई मिळणे, १ रुपयात पिक विमा ही योजना शेतक-यांसाठी कि कंपन्यासाठी याबाबत संशय निर्माण होणे, दावोस येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेत राज्यातील अनुक्रमे १५.७० आणि ३७.२७ लाख कोटी रुपयांचे ५४ आणि ५१ सामंजस्य करार करण्यात येणे, यापैकी एकही नवीन उदयोग राज्यात उभारला नसणे, परंतु टाटा एअर बस, वेदांता, सॅफ्रेन इत्यादी अनेक मोठे प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे नवीन रोजगार निर्मितीचा केवळ फुगवटा निर्माण करणे, कौशल्य विकास केंद्राच्या आकडेवारीनुसार राज्यात सुमारे ७१ लाख बेरोजगारांची नोंद होणे, राज्यात गतवर्षामध्ये मंत्री महोदयांवर भ्रष्टाचाराचे आरोप होवूनही कुठलीही कार्यवाही झाली नसल्याने आता

त्यांच्या दालनापर्यंत लाचखोरीचे प्रकरण पोहचले असणे, तथापि शासन अशा मंत्री महोदयांना अभय देत आहे, भ्रष्टाचाराचा नवीन प्रकार शासनामध्ये सुरु झाला असे, निविदा काढणे, किरकोळ निधी उपलब्ध करुन देणे व ठेकेदाराची देयके थकविणे या प्रकरणी अनेक ठेकेदारांनी आंदोलने व आत्महत्या करणे, शिक्षकांचे विविध प्रश्न प्रलंबित असणे, शासन विकासाच्या गप्पा मारत असून नियोजन शून्यतेमुळे मुंबई - पुणे एक्सप्रेसवेवर ३० तास वाहतूक ठप्प झाली व अन्न-पाण्याविना नागरिकांचे अतोनात हाल होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**आठ : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **सर्वश्री संजय खोडके, विक्रम काळे, अमोल मिटकरी, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"राज्य शासनाकडून शेतकऱ्यांकडील सोयाबीन हमीभावाने (MSP) खरेदी करण्यासाठी आखण्यात आलेले धोरण अंमलात आणताना विविध प्रशासकीय व कार्यात्मक अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत असणे, विशेषतः सोयाबीनचे उत्पादन बाजारात येण्याच्या कालावधीत तात्काळ खरेदी सुरू करणे आवश्यक असताना अनेक ठिकाणी MSP खरेदी केंद्रे वेळेवर सुरू न होता उशिरा सुरू केली असणे, परिणामी, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाची वेळेवर विक्री करता येत नसणे, गरजेनुसार खरेदी केंद्रांची संख्या निश्चित न करणे, खरेदी कालावधीबाबत स्पष्ट व पूर्वनियोजित वेळापत्रक जाहीर न करणे, तसेच प्रशासनाकडील परवानगी प्रक्रिया, मंजुरीतील विलंब आणि धोरणात्मक अनिश्चितता यांमुळे खरेदी केंद्रे वेळेवर सुरू करण्यात अडथळे येत असणे, काही केंद्रांवर सोयाबीनच्या आर्द्रता टक्केवारी व गुणवत्ता (FAQ Standard) संदर्भातील निकषांमुळेही खरेदी प्रक्रियेत अडचणी निर्माण होत असणे, तसेच काही प्रकरणांमध्ये शेतकऱ्यांकडे सोयाबीन शिल्लक असतानादेखील खरेदी केंद्रे अकाली बंद करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना हमीभावाने विक्रीची संधी मिळत नसणे, त्यामुळे शेतकऱ्यांना कमी दराने खुल्या बाजारात विक्री करावी लागत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच मान्यता प्राप्त खाजगी अंशतः अनुदानित, विनाअनुदानित व १०० टक्के अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त होऊन नंतर १०० टक्के

अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना (OPS) लागू करावी, याबाबत विविध शिक्षक संघटना शासनाकडे वारंवार निवेदने सादर करीत असून याबाबत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी निर्देश दिलेले असूनही शासनाने अद्याप अंतिम निर्णय जाहीर केलेला नसणे, शासकीय, निमशासकीय, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली राज्यातील सुमारे १७ लाख कर्मचारी व शिक्षक दिनांक १४ ते २० मार्च, २०२३ या कालावधीत बेमुदत संप पुकालेला असणे, त्यानंतर माजी मुख्य सचिव श्री.सुबोध कुमार यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नियुक्त करुन उक्त समितीस दिनांक १४ जून, २०२३ पर्यंत तीन महिन्यांची मुदत देण्यात आली असणे, याच अनुषंगाने जुनी पेन्शन योजनेच्या संदर्भात समन्वय संघाच्या नेतृत्वाखाली दिनांक ३ मे, २०२३ पासून आझाद मैदान येथे बेमुदत आंदोलन सुरू असून दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी अनुदानित, विनाअनुदानित किंवा अंशतः अनुदानित शैक्षणिक संस्था, वस्ती शाळा तसेच इतर विभागांमध्ये जनसेवक म्हणून नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक असणे, तसेच, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत असलेल्या अनेक शिक्षकांची जीपीएफ खाती सुरू असली तरी त्यामध्ये हप्त्यांची कपात सध्या होत नसणे, सन २००५ नंतर शासनाने शासकीय, निमशासकीय सेवा तसेच नगरपालिका, महानगरपालिका व इतर अनुदानित शाळांमधील सुमारे १६,१०,००० शासकीय कर्मचारी व सुमारे ७,००,००० मान्यताप्राप्त शिक्षक/कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू न करता नवीन निवृत्तीवेतन योजना (NPS) लागू केलेली असणे, डीसीपीएसमधील (DCPS) जमा रक्कम अद्याप एनपीएसमध्ये वर्ग झालेली नसल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना अचूक आर्थिक तपशील उपलब्ध होत नसणे, काही कर्मचाऱ्यांची एनपीएस खाती अद्याप सुरू झालेली नसल्याची बाब निदर्शनास येणे, नगरपालिका व महानगरपालिका शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहावा व सातवा वेतन आयोगाचे हप्ते प्रलंबित असल्याच्या तक्रारी असणे, विभागाच्या शासन निर्णयानुसार दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर राज्यातील जिल्हा परिषद तसेच मान्यता प्राप्त खाजगी १००% अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयांतील १००% अनुदानित पदावरील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी, जे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS/NPS) सदस्य आहेत, त्यांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबास कुटुंब निवृत्तीवेतन व मृत्यू उपदान तसेच रुग्णतेमुळे सेवानिवृत्त झाल्यास रुग्णता निवृत्तीवेतन व सेवानिवृत्ती उपदान देण्याबाबत Maharashtra

Civil Services (Pension) Rules, 1982 मधील तरतुदीनुसार कुटुंब निवृत्तीवेतन व रुग्णता निवृत्तीवेतन लागू करण्याचा विषय शासनाच्या विचाराधीन असणे, उक्त प्रकरणी शासनाने सविस्तर चौकशी करुन समितीच्या अहवालातील शिफारशींनुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी व त्यानंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २ मार्च, २०२६.

**डॉ. विलास आठवले**,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.